Instructions for Voting through electronic means

In terms of Section 108 of the Companies Act, 2013 and Rule 20 of the Companies (Management & Administration) Rules, 2014 (as amended) read Regulation 44 of SEBI (Listing Obligations and Disclosures Requirements Regulations) 2015 and aforesaid MCA circulars, your Company will be providing remote e-voting facility to the members in respect of the business to be transacted at AGM and has arranged the facility for voting through electronic means through Central Depository Services Limited (CDSL) as the authorized e-voting agency.

Members are informed that –

(a) Voting through electronic mode shall commence on 17th September, 2024 at 9.00 A.M. and will end on 19th September, 2024 at 5.00 p.m.

(b) Voting through electronic mode shall not be allowed beyond 5.00 PM. on 19th September, 2024.

(c) Any person who acquires shares of the Company and become a member of the company after the dispatch of Notice of Annual General Meeting and holding shares as on the cut-off date i.e. 13th September, 2024 may obtain the log in and password by following the procedures as mentioned in the Notice of the Annual General Meeting or by sending a request email to helpdesk.evoting@cdslindia.com or cmmhcosec@gmail.com. However, if a person is already registered with M/S. Central Depository Services India Limited(CDSL) for e-voting then existing user id and password can be used for casting vote.

(d) Member(s) can join and participate in the 34th Annual General Meeting and the manner of participation in the remote electronic voting or casting vote through e-voting system during the 34th AGM are provided in the Notice of the 34th AGM. Members participating through the VC/OAVM facility shall be counted for the purpose of reckoning the quorum under Section 103 of the Companies Act, 2013. The Notice of the 34th AGM and the Annual Report will also be available on the website of the Company i.e. www.cmmh.in and website of the BSE Limited i.e. www.bseindia.com.

(e) The members who have cast their votes through remote e-voting prior to the AGM may also attend /participate in the AGM through VC/OAVM but shall not be entitled to cast their votes again.

(f) Those Members, who shall be present in the AGM through VC/OAVM facility and had not cast their votes on the Resolutions through remote e-voting and otherwise not barred from doing so, shall be eligible to vote through remote e-voting during the AGM.

(g) In case of any queries Members may refer the instructions on e-voting contained in the Notice or refer the Frequently Asked Questions (FAQs) and user manual on the e-voting website of CDSL to get further Clarifications relating to e-voting process, the Members may contact M/s Cameo Corporate Services Limited at investor@cameoindia.com - Tel:044-28460390-394.

(h) The Company has appointed Mr. T. Murugan, Practicing Company Secretary to act as the Scrutinizer to scrutinize the voting and remote-voting process in a fair and transparent manner.

(i) If a Member casts votes by both modes, then voting done through e-voting shall prevail and e-voting during the AGM shall be treated as invalid.

(j) The results of e-voting will be announced by the Company on its website www.cmmh.in and also to Stock Exchange www.bseindia.com

The above information is being issued for the information and benefit of all the Members of the Company and is in compliance with the MCA Circulars and the SEBI Circulars.

By Order of the Board
For Chennai Meenakshi Multispeciality Hospital Limited
(Sd/-) Bharathraj Panchal
Company Secretary & Compliance Officer
F9828

Date : 27.08.2024
Place: Chennai

प्रातःकाल
www. pratahkal.com

संपादकीय

असे राजकारण घातकच!

पश्चिम बंगालमधील कोलकाता येथील निर्भया-२ प्रकरणाने संपूर्ण देश हादरला. पश्चिम बंगालमध्ये मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्या राजीनाम्यासाठी मोठ्या प्रमाणात विद्यार्थी रस्त्यावर उतरले आहेत. त्यांना रोखण्यासाठी पोलिसांनी वॉटर कॅननचा मारा केला, अश्रूधुराच्या नळकांड्या फोडल्या, लाठीचार्जही केला; तरीही विद्यार्थी आंदोलनावर ठाम आहेत. मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्या राजीनाम्यासाठी मोठ्या प्रमाणात विद्यार्थी रस्त्यावर उतरले आहेत. कोलकात्यामधील आरजी कार मेडिकल रुग्णालयामध्ये एका प्रशिक्षणार्थी डॉक्टरवर लैंगिक अत्याचार करून हत्या करण्यात आल्याचा प्रकार घडला. यावरून विद्यार्थ्यांमध्ये प्रचंड असंतोष आहे. याप्रकरणी आरोपीला अटक करण्यात आली आहे. मात्र, विद्यार्थ्यांनी ममता बॅनर्जी यांच्या राजीनाम्याची मागणी लावून धरली आहे. सध्या या मुद्द्यावरून पश्चिम बंगालमधील वातावरण तापले आहे. कोलकाता येथील आर जी कार वैद्यकीय महाविद्यालयातील एका महिला डॉक्टर प्रशिक्षणार्थीवर ज्या क्रूर पद्धतीने लैंगिक अत्याचार करून निर्घृण पद्धतीने तिला ठार करण्यात आले, तो प्रकार म्हणजे या संपूर्ण देशातील जनतेची मान खाली घालावयास लावणारा म्हणावा लागेल. कोलकाता येथील हे प्रकरण ताजे असतानाच महाराष्ट्रात मुंबईजवळ बदलापूर येथे दिनांक १३ ऑगस्ट रोजी दोन छोट्या कोवळ्या चार वर्षाच्या बालिकांवर शाळेच्या एका कर्मचाऱ्याकडून झालेल्या अत्याचाराने आणखीन एक जोरदार हादरा बसला. आपण जगासमोर, या देशातील सुजाण नागरिकांसमोर काय निर्माण करीत आहोत, असा प्रश्न आपल्यासमोर पडतोय. देशातील महिलांवर सध्या होत असलेले अत्याचार पाहिल्यानंतर शिसारी येते आणि संताप निर्माण होतो. देशात कोलकाता येथील घटनेने आपल्या भारतीय संस्कृतीला हरताळ फासला गेला. आपल्याला आपण भारतीय आहोत याची लाज वाटावी, असा हा अत्याचार आहे. अनेकांच्या शरीरात अत्याचाराची बीजे पेरली जात आहेत आणि त्यातून हे अत्याचारी राक्षस निर्माण होत आहेत.

कोलकाता येथील प्रकार आणि १३ ऑगस्ट रोजी बदलापूर येथे झालेल्या दोन चिमुरड्यांवरील अत्याचार हे सर्व प्रकार अत्यंत घृणास्पद आहेत आणि निषेधाचे कोणत्याही स्तरावरचे शब्द वापरले तरी ते कमीच पडतील. या देशात महिलांवर होणारे वाढते अत्याचार थांबण्याचे नाव घेत नाही हे लक्षात आल्यानंतर आता यानंतर महिलांवर अत्याचार करणाऱ्या व्यक्तीविरुद्ध अरब राष्ट्रांमध्ये जशी कडक शिक्षा दिली जाते तशीच कडक शिक्षा देण्याची तरतूद भारताला देखील यानंतर करावी लागेल असे दिसते. पश्चिम बंगालमध्ये लैंगिक अत्याचाराविरोधात मोर्चे, आंदोलने, जाळपोळ, दगडफेक, अश्रुधुरांच्या नळकांड्या वगैरे अत्यंत स्फोटक वातावरण निर्माण झाले आहे. शेवटी हे प्रकरण गंभीर स्वरूपाचे आहे याची जाग न्यायालयांना देखील आली आणि न्यायालयाने हे प्रकरण गंभीर पद्धतीने हाताळण्यास प्रारंभ केलेला आहे. असे असले तरी अशी प्रकरणे यानंतर घडू नयेत आणि ज्यांनी हे अत्याचार केलेले आहेत त्यांना एवढी कडक शिक्षा झाली पाहिजे की ही शिक्षा पाहून यानंतर कोणालाही स्त्रियांवर अत्याचार करण्याचे धाडस होऊ नये. जो कोणी धाडस करील तो आपल्या प्राणास मुकणार, एवढेच त्या व्यक्तीच्या ध्यानात येणे गरजेचे आहे. त्यासाठीच होतील तेवढी कडक प्रावधाने भारतीय महिला संरक्षण कायद्यात निर्माण करणे आवश्यक आहे. संपूर्ण देशाला, देशाच्या संस्कृतीला, देशाच्या तत्त्वांना काळीमा फासणाऱ्या या नराधमांना आयुष्यभर पश्चाताप होईल अशा पद्धतीची शिक्षा तीदेखील सार्वजनिकरित्या होणे आवश्यक आहे. बंगालमधील घटनेमध्ये जे काही झाले आहे त्या संदर्भात दुर्दैवी महिलेचा शवविच्छेदन अहवाल हाती आल्यानंतर एकापेक्षा एक थरकाप उडवणाऱ्या बाबी उघड होत आहेत. त्यामुळे अशा नराधमाला केवळ आयुष्यभर तुरुंगात ठेवून नव्हे तर होईल तेवढे अत्याचार त्या व्यक्तीवर करून त्याला संपविणे आवश्यक ठरेल. त्याला केवळ भारतातच नव्हे या पृथ्वीवर जगण्याचा अधिकार मुळीच असू नये.

बदलापूर येथील घटनेमध्ये शाळेच्या सफाई कर्मचाऱ्याने ज्या चिमुरड्या बालिकांवर अत्याचार केले त्यासही अशाच पद्धतीची कडक शिक्षा व्हावी. या देशात महिलांना देवीचे स्वरूप मानले जाते. आपल्या धर्मात महिलांना फार आदर्श आणि आदरयुक्त असे स्थान आहे. देशात महिलांवरील अत्याचार दिवसेंदिवस वाढत आहेत ही दुर्दैवाची बाब आहे. महिलांकडे असलेले नैसर्गिक सौंदर्य हा शाप ठरतोय अशी आजची स्थिती आहे. बिघडत चाललेली आजची पिढी आणि त्यातून होत असलेले अत्याचार दुराचार याचे मुख्य कारण म्हणजे संस्काराचा अभाव आहे. आज देशात आपण आपल्याच संस्कार पद्धतीवर हसतो, आपले संस्कार हाच एक टीकेचा विषय बनतोय, मात्र आपल्या संस्कृतीने असा दुराचार करायला आपल्याला कधीही शिकवलेले नाही. संस्कारापासून नवीन पिढी दूर जाते आणि विदेशी संस्कार तसेच भ्रमणध्वनीद्वारे लैंगिक अत्याचाराच्या व्हिडिओ क्लिप्स यातून काहीजणांना मिळणारी प्रेरणा इथूनच बिघडत्या वातावरणास प्रारंभ होतो आणि त्यातून अत्याचार, गुन्हेगारीचे प्रमाण वाढते. ते रोखण्यासाठी जोपर्यंत कडक शिक्षेची तरतूद होत नाही तोपर्यंत कायद्याचा धाक उपयोगी पडत नाही. म्हणूनच या दोन घटनांनी संपूर्ण देशात जी जागृती निर्माण होतेय त्यातून किमान कडक शिक्षेची तरतूद तरी होईल असे वाटते. एक महिला ही आई असते, बहीण, पत्नी असते. मैत्रीण असते मावशी असते. अशी अनेक नाती ती निर्माण करीत असते. अत्याचार करणारे पुरुष जन्म घेतात तो देखील एका महिलेच्या उदरात. त्यामुळे या पवित्र नात्याचा जरूर विचार एकदा तरी मनात येणे आवश्यक आहे आणि त्यासाठीच भारतीय संस्कार हे अत्यंत महत्त्वाचे आहेत.

आता या आंदोलनाची धग काही दिवसांनंतर शांत होईलही. समाजमन सर्वकाही विसरून आपल्या कामात दंग होईल. तरीही काही प्रश्नांची उत्तरे अनुत्तरित राहतील. ज्यांचे या घटनेने हृदय हेलावले असेल त्यांच्या मनामध्ये एक कायमची सल बोचत राहते. समाजामध्ये असे नराधम जन्माला येतातच कसे, असा त्यांचा प्रश्न असतो. ज्या देशामध्ये मातृशक्तीची आदीशक्ती म्हणून पूजा केली जाते, त्या देशामध्ये असे जघन्य अपराध जर घडत असतील तर देशातील सुसंस्कृत समूहाने याबाबीची दखल घेत अशा प्रवृत्तींना आधीच ठेचण्यासाठी सज्ज असायला हवे. समाज संस्कृतीपासून दूर गेला अन् संस्कृतीची फारकत झाली की, समाजाचे आरोग्य बिघडते. आम्ही आमच्या परंपरा आणि चालीरीती सध्या खुंटीला टांगून ठेवल्याने समाजामध्ये नको त्या गोष्टींनी शिरकाव केला आहे. त्यामुळे अशा निरपराधांना त्याची नाहक सजा भोगावी लागते. पीडितेचे संपूर्ण कुटुंब उघड्यावर येते. हृदयात झालेल्या जखमांना कुरवाळीत अख्ख आयुष्य आई-वडिलांना जगावं लागतं. आमच्या संस्कृतीला हीन समजत आम्ही पाश्चिमात्य संस्कृतीच्या मागे फरफटत गेलो. त्याची फळे आज आम्ही भोगत आहोत. या अधोगतीच्या चक्राने संपूर्ण समाज पोखरत चालला आहे. तरीही आमची कुंभकर्णी झोप अजूनही उघडत नाही. खरं तर अशा सुसंस्कृत देशामध्ये कोठेच अश्लिलतेला स्थान असायला नको. ऋषी, मुनी व गुरू परंपरेने नटलेल्या या देशामध्ये सभोवताली घडणाऱ्या घटना बघितल्या की मन विषन्न होते. आधुनिकता ही जरी आज काळाची गरज असली तरी, ती कितपत आत्मसात करावी याचे भान असायला हवे. निव्वळ आधुनिकतेच्या मागे लागून अधोगतीशी आम्ही जुळणार असू तर ही आधुनिकता समाजाला रसातळाला नेणारी ठरू शकते. ही सजगता जोवर समाजमन ठेवणार नाही, तोवर आमच्या मनामधील प्रश्नाचे उत्तरही आम्हाला मिळणार नाही. महिला डॉक्टरच्या हत्येनंतर पश्चिम बंगालमधील ममता बॅनर्जी यांचे सरकारही वादाच्या भोवऱ्यामध्ये सापडले आहे. संपूर्ण पश्चिम बंगालमध्ये तृणमूल काँग्रेसच्या गुंडांचे एकछत्री राज्य आहे. मुख्यमंत्री ममता बॅनर्जी कितीही लोकशाहीच्या गप्पा मारीत असल्या तरी त्यांच्या गुंडांनी माजवलेली अराजकता तेथील सामान्य जनतेसाठी अभिशाप ठरली आहे.

करुणाष्टक: दारिद्र्याने ग्रासलेली आठ मुलांची दुःखी आई!

रानोमाळ स्वच्छंद भ्रमंती करणारे निसर्गप्रेमी, शिकारी तसेच चित्रकार म्हणूनही त्यांची ख्याती आहे. चित्रकलेचे कसलेही औपचारिक शिक्षण नसताना त्यांनी ही कला प्राप्त केली जागतिक कीर्तीच्या चित्रकारांच्या चित्रशैलीचा रसिकतेने शोध घेतला. त्यांची अनेक सुंदर रेखाटने प्रसिद्ध झालेली आहेत. आकाशवाणीवर ते दीर्घकाळ सन १९५५–८५पर्यंत नोकरीत होते. त्यांच्या अनेक पुस्तकांना महाराष्ट्र राज्य पुरस्कार लाभले. व्यंकटेश दिगंबर माडगूळकर हे एक श्रेष्ठ मराठी कथाकार आणि कादंबरीकार होते. त्यांचा जन्म सांगली जिल्ह्यातील माडगूळ येथे दि.६ जुलै १९२७ रोजी झाला. औपचारिक शिक्षण फारसे मॅट्रिकपर्यंतही झाले नाही. तथापि स्वप्रयत्नाने वाङ्मयाचा व्यासंग केला. इंग्रजी शिकून पाश्चात्त्य साहित्याचेही वाचन केले. विख्यात साहित्यिक ग.दि.माडगूळकर ह्यांचे व्यंकटेश हे धाकटे बंधू. आपल्या वडील बंधूंच्या पाठोपाठ तेही साहित्यसृष्टीत आले आणि आपल्या प्रतिभेचा एक स्वतंत्र ठसा त्यांनी तेथे उमटविला. आरंभी काही काळ पत्रकारी केल्यानंतर ते १९५० च्या सुमारास मुंबईस आले आणि मराठी चित्रसृष्टीत पटकथालेखन करू लागले. तत्पूर्वी माणदेशी माणसे-१९४९ हा त्यांचा कथासंग्रह प्रसिद्ध झाला होता. त्यातील व्यक्तिरेखांतून त्यांनी ग्रामीण माणसाचे जे अस्सल आणि जिवंत दर्शन घडविले, ते तोवरच्या मराठी साहित्याला अनोखे होते.



कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजी

अद्‌भुतता, स्वप्नरंजन, कल्पनारम्यता यांच्या पकडीतून सुटलेल्या वास्तववादी ग्रामीण साहित्यकृतींचा आरंभ त्यांच्या या कथासंग्रहापासून झाला. त्यानंतर गावाकडच्या गोष्टी-१९५१, हस्ताचा पाऊस-१९५३, सीताराम एकनाथ-१९५१, काळी आई-१९५४, जांभळाचे दिवस-१९५७ यासारखे त्यांचे कथासंग्रह प्रसिद्ध झाले. त्यांच्या कथांचे अनुवाद डॅनिश, जर्मन, जपानी आणि रशियन अशा विविध जगातिक भाषांत झालेले आहेत.

ग्रामीण कथेप्रमाणेच ग्रामीण कादंबरीच्या संदर्भातही त्यांनी महत्त्वपूर्ण कामगिरी बजावली. बनगरवाडी-१९५५, वावटळ-१९६४, पुढचं पाऊल-१९५०, कोवळं दिवस-१९७९, करुणाष्टक-१९८२ आणि सत्तांतर-१९८२ या त्यांच्या कादंबऱ्या उल्लेखनीय आहेत. बनगरवाडीतून व्यंकटेश माडगूळकरांची प्रयोगशीलता प्रत्ययास येते. रूढ अर्थाने या कादंबरीला कथानक नाही. बनगरवाडी नावाच्या या लहानशा गावातील सामूहिक जीवनाचे विविधांगी चित्रण तीत केलेले आहे. तेथील उजाड व निष्पर्ण सृष्टी, तेथील कंगालपणा, दुष्काळ, तेथील सण, उत्सव, रूढी, परंपरा, श्रद्धा, संकेत तेथील रहिवाशांच्या जीवनांतील चढउतार यांना जिवंत शब्दरूप तेथे लाभले आहे. येथे कोणी विशिष्ट व्यक्ती नायक वा नायिका नाही, तर बनगरवाडी या गावालाच नायकत्व देण्यात आलेले आहे. इंग्रजी व डॅनिश या भाषांतून ही कादंबरी अनुवादिली गेली आहे. (इंग्रजी–द व्हिलेज हॅड नो वॉल्स –डॅनिश.). वावटळ, करुणाष्टक आणि कोवळे दिवस या त्यांच्या कादंबऱ्या आत्मचरित्रपर आहेत. गांधीवधानंतर झालेल्या भीषण दंगली, लुटालूट आणि जाळपोळ यांनी ब्राह्मण समाजावर झालेल्या आघाताची वावटळ ही कहाणी होय. विंड्स ऑफ फायर या नावाने तिचे इंग्रजी भाषांतर झाले आहे.

करुणाष्टकात दारिद्र्याने ग्रासलेली आठ मुलांची दुःखी आई त्यांनी उभी केली. व्यंकटेश माडगूळकर हे १९४२च्या स्वातंत्र्यलढ्यात सहभागी झालेले होते. कोवळे दिवस या कादंबरीत अशाच एका कोवळ्या स्वातंत्र्यसैनिकाचे अनुभव आहेत. पुढचं पाऊल ही त्यांच्याच एका कथेवरून त्यांनी लिहिलेली कादंबरी. एका दलित कलावंताच्या जीवनावरील ह्या कादंबरीत त्याच्यावरील अन्याय, त्याबद्दलची त्याची चीड आणि पुढंच पाऊल टाकून प्रगतीचा मार्ग चोखाळण्याची दलित मनाची धडपड दाखविली आहे. सत्तांतर मध्ये आरंभापासून अखेरपर्यंत वानरांच्या टोळ्यांचे सूक्ष्म आणि मार्मिक चित्रण आहे. प्रत्येक टोळीचे जंगलातील क्षेत्र, टोळ्यांची परस्परांच्या हद्दीत चालणारी घूसखोरी, त्यांचे संघर्ष नरानरांतले, माद्यामाद्यांतले सर्व वानरांची जंगलातील हिंस्त्र प्राण्यांपासून आणि शिकाऱ्यांपासून स्वतःच्या टोळीचा बचाव करण्याची धडपड, टोळीचे नायकत्व आणि टोळीतील माद्या मिळविण्यासाठी वानरांना कराव्या लागणाऱ्या हाणामाऱ्या यांचे विलक्षण परिणामकारक दर्शन या छोट्याशा कादंबरीत आहे. सत्तांतर म्हणजे टोळीचा एक नायक जाऊन तेथे दुसरा नायक येणे. हे कसे घडते, हे या कादंबरीचे कथानक होय. तथापि वानरांच्या या कथेतून मानवी जगातील वृत्तिप्रवृत्तींचीही प्रतीकात्मक पातळीवर प्रत्यय येत राहतो.

काळाप्रमाणे संघर्षही सतत वाहतच असतो जेव्हा एखादी जात धोक्यात येते, बाहेरूक परकं कुणी येतं आणि बंदिस्त टोळीत घुसू पाहतं, तेव्हा संघर्ष उतू जातो .. संघर्ष पेटला, की शस्त्रास्त्रं वापरली जातात. ज्यांना शस्त्रास्त्रं माहीतच नसतात, ते सुळे, नखं वापरतात. संघर्ष सर्वत्र भरून राहिलेला असतो, ही कादंबरीतली काही वाक्ये फार अर्थपूर्ण आहेत. त्यांनी नाटकेही लिहिली- तू वेडा कुंभार, सती, पति गेले गं काठेवाडी ही त्यांतील काही विशेष उल्लेखनीय होत. कुनाचा कुनाला मेळ न्हाई आणि बिनबियांचे झाड ही त्यांनी लिहिलेली लोकनाट्येही गाजली. त्यांनी लिहिलेल्या चित्रपटांत पुढचं पाऊल- कथा-१९५०, वंशाचा दिवा-कथा-१९५०, जशास तसे-कथा-१९५१, सांगत्ये ऐका-पटकथा, संवाद-१९५९, रंगपंचमी-पटकथा, संवाद-१९६१ यांचा समावेश होतो. नागझिरा-१९७९, पांढरी मेंढरे, हिरवी कुरणे-१९७९, पांढऱ्यावर काळे-१९७१, रानमेवा-१९७८, चित्रे आणि चरित्रे-१९८३ ही त्यांची पुस्तके ललित गद्य या प्रकारातली.

रानोमाळ स्वच्छंद भ्रमंती करणारे निसर्गप्रेमी, शिकारी तसेच चित्रकार म्हणूनही त्यांची ख्याती आहे. चित्रकलेचे कसलेही औपचारिक शिक्षण नसताना त्यांनी ही कला प्राप्त केली जागतिक कीर्तीच्या चित्रकारांच्या चित्रशैलीचा रसिकतेने शोध घेतला. त्यांची अनेक सुंदर रेखाटने प्रसिद्ध झालेली आहेत. आकाशवाणीवर ते दीर्घकाळ सन १९५५–८५पर्यंत नोकरीत होते. त्यांच्या अनेक पुस्तकांना महाराष्ट्र राज्य पुरस्कार लाभले. त्यांत गावाकडील गोष्टी, काळी आई यांसारखे कथासंग्रह, बनगरवाडी ही कादंबरी आणि सती ही नाट्यकृती यांचा अंतर्भाव होतो. सत्तांतरला तर १९८३चे साहित्य अकादेमीचे पारितोषिक प्राप्त झाले. १९८३मध्ये आंबेजोगाई येथे भरलेल्या मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद त्यांना देऊन त्यांच्या साहित्यसेवेचा गौरव करण्यात आला. अशा या साहित्यप्रेमी व्यंकटेश माडगूळकर यांनी दि.२८ ऑगस्ट २००१ रोजी जगाचा कायमचा निरोप घेतला.

जीवनाच्या तत्वज्ञानाला वेगळा अर्थ देणारे गीतकार : शैलेंद्र

हिंदी सिनेमाच्या सुवर्णयुगातील ख्यातनाम गीतकार शंकरदास केसरीलाल शैलेंद्र, हे नावच त्यांची साहित्यिक सृजनशीलता आणि सामाजिक जाणीव यांच्या प्रतिबिंबाने भारावून गेलेल्या त्यांच्या गीतांसाठी पुरेसं आहे. ३० ऑगस्ट रोजी शैलेंद्र यांची १०१ वी जयंती आहे. त्यानिमित्ताने हिंदी सिने प्रेमींसाठी त्यांच्या कारकीर्दीचा थोडक्यात घेतलेला आढावा. शैलेंद्र यांचा जन्म ३० ऑगस्ट १९२३ रोजी रावळपिंडी (आता पाकिस्तानमध्ये) येथे झाला. त्यांच्या बालपणीच त्यांचे कुटुंब बिहारमध्ये स्थलांतरित झाले. शैलेंद्र यांचे बालपण साहित्य आणि कवितेमध्ये गेले. त्यांचे कुटुंब श्रीमंत नसले तरी, त्यांच्या सर्जनशील व्यवसायांना घरातून प्रोत्साहन दिले गेले. तरुणपणीच त्यांनी आपल्या प्रतिभावान लेखणीने हिंदी कविता लिहायला सुरुवात केली. आपल्या कवितांच्या माध्यमातून त्यांनी समाजातील अन्याय, विषमता, आणि दारिद्र्य यांवर प्रखर टीका केली. त्यांनी देशभक्ती आणि सामाजिक विषयांवर विपुल लिखाण केले, ज्यामुळे इंडियन पीपल्स थिएटर असोसिएशन (IPTA) चे लक्ष वेधून घेतले. १९४७ मध्ये शैलेंद्र मुंबईत आले आणि त्यांनी रेल्वेमध्ये वेल्डर म्हणून काम केले. त्यांच्या कविता आणि गीतांमधून त्यांच्या विचारांचे प्रतिबिंब स्पष्ट दिसत असे. आयपीटीएमधील त्यांच्या सहभागामुळे त्यांना त्यांच्या निर्मितीसाठी गाणी लिहिण्यास प्रवृत्त केले.

विजय कोष्टी

शैलेंद्रच्या आयुष्याला नाट्यमय वळण मिळाले, जेव्हा ते राज कपूरला , एक संघर्षशील अभिनेता, एका काव्यवाचन कार्यक्रमात भेटले. शैलेंद्र यांच्या कामाने प्रभावित झालेल्या कपूर यांनी शैलेंद्र यांच्या कवितेतील ताकद ओळखली. त्यांनी शैलेंद्र यांना आपल्या चित्रपटासाठी गीत लेखन करण्यासाठी निमंत्रण दिले. सुरुवातीला शैलेंद्रने नकार दिला, पण शेवटी (पाचशे रुपयांच्या कर्जामुळे) सहयोग करण्यास तयार झाले. त्यांनी "आग" या चित्रपटासाठी गीत लिहिण्यास सहमती दिली, आणि त्यांचा चित्रपट गीतकार म्हणून प्रवास सुरू झाला. ही एका ऐतिहासिक भागीदारीची सुरुवात होती जिने बॉलीवूडची काही सर्वात प्रिय गाणी तयार केली. राज कपूरसोबत त्यांची मैत्री विशेष जवळची होती, दोघांमध्ये एक खोल बंध जुळला होता जो व्यावसायिक भागीदारीच्या पलीकडे गेला होता. शैलेंद्र अनेकदा कपूर यांच्या निवासस्थानी राहायचे आणि त्यांच्या कविता, सिनेमा आणि जीवनाविषयी रात्री उशिरापर्यंत झालेल्या संभाषणांनी त्यांच्या काही सर्वात प्रतिष्ठित कामांना प्रेरणा दिली.

राज कपूर, शंकर-जयकिशन, हसरत जयपुरी आणि मुकेश यांच्या सोबत शैलेंद्रच्या सहकार्यामुळे कालातीत क्लासिक्स मिळाले. त्यांची काही अवीट गाणी.. "आवारा हूं" (आवारा), "बरसात में" (बरसात), "मेरा जूता है जपानी" (श्री ४२०), "जीना यहाँ मरना यहाँ" (मेरा नाम जोकर), "दिल का हाल सुने दिलवाला" (श्री ४२०), "रमैया वस्तावैय्या" (श्री ४२०), "किसी की मुस्कुरातों पे" (अनारी), "छोड दो आंचल" (बरसात), "ओ मेरे सनम" (संगम), सब कुछ सिखा हमने न सिखी होशीयारी (अनाडी) . शैलेंद्र यांच्या गीतांमध्ये एक सहजता आणि साधेपणा होता, जो त्यांच्या शब्दांमध्ये आणि विचारांमध्ये प्रतिबिंबित होत असे. त्यांनी एस.डी. बर्मन आणि शंकर-जयकिशन यांच्या संगीत दिग्दर्शनाखाली अनेक गीते लिहिली. त्यांच्या गीतांमध्ये एक खास जादू होती जी आजही रसिकांच्या मनाला भिडते.

ए. के. कॅपिटल सर्व्हिसेस लिमिटेड
बिल्डीग बाँण्ड्स

नोंदणीकृत कार्यालय : ६०३, ६ वा मजला, विंडसर, ऑफ. सीएसटी रोड, कलिना, सांताक्रुझ (पूर्व), मुंबई ४०० ०९८.
सीआयएन : L74899MH1993PLC274881 वेबसाइट : <www.akgroup.co.in> दूर. +९१-२२-६७५४६५०० ईमेल : compliance@akgroup.co.in

३१ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना (एजीएम)

१. **सूचना** याद्वारे देण्यात येत आहे की, **ए. के. कॅपिटल सर्व्हिसेस लिमिटेड** (कंपनी) च्या सभासदांची ३१ वी एजीएम **शनिवार, दि. २१ सप्टेंबर, २०२४ रोजी स. ९.०० वा. (भापवे)** दोन स्वरूपात व्हिडीओ कॉन्फरंस (व्हीसी)/ अन्य ऑडिओ विजुअल मीन्स (ओएव्हीएम) केवळ मार्फत एजीएमच्या ठिकाणी कंपनी कायदा, २०१३ च्या लागू तरतूदी अनुपालन व सेबी (सूची अनिवार्यता व विमोचन आवश्यकता) विनियमन, २०१५ यांच्या अंतर्गत सामान्य सर्क्युलर दि. ८ एपिल, २०२०, १३ एपिल, २०२० व ५ मे, २०२०, १३ जानेवारी, २०२१, १४ डिसेंबर, २०२१ व ५ मे, २०२२ अंतर्गत एकत्रितरित्या एमसीए सर्क्युलर म्हणून संदर्भित व सीक्युरिटीज अॅन्ड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया (सेबी) सर्क्युलर क्र. सेबी/एचओ/सीएफडी/सीएमडी/सीआयआर/पी/२०२२/१६७ दि. ७ ऑक्टोबर, २०२३ रोजी सभेच्या ठिकाणी समान ठिकाणी सभासदांच्या उपस्थितीविना प्रत्यक्ष उपस्थित राहावे. एजीएमचे ठिकाण कंपनीच्या नोदणीकृत कार्यालय पत्ता ६०३, ६ वा मजला, विंडसर, ऑफ सीएसटी रोड, कलिना, सांताक्रुझ पूर्व, मुंबई ४०० ०९८.

२. वित्तीय वर्ष २०२३-२४ करिता कंपनीचा वार्षिक अहवालासह ३१ वी एजीएमची सूचना तसेच ३०वी एजीएममध्ये जोडले जाण्याकरिता लॉगीन आयडी पास करावा व सूचनेची ईलेक्ट्रॉनिक पत आरटीए वेबसाइट <www.akgroup.co.in> यांच्यासह बीएसई लि.www.bseindia.com वेबसाइट व आरटीए कंपनीची वेबसाइट <https://instavote.linkintime.co.in> वर सुद्धा उपलब्ध आहे व नोदणीकृत सभासदांना त्यांच्या ईमेल वर सूचना व्हीसी वा ओएव्हीएम मार्फत पाठविली आहे. एमसीए सर्क्युलर्स व सेबी वर सर्क्युलर्स यांच्यासह एजीएम व वार्षिक अहवालाची प्रत्यक्ष प्रत पाठवणे आवश्यक आहे.

३. **नोदणीकरण/ ईमेल आयडी अपडेट करण्याचे स्वरूप :**
ज्यांनी एजीएमच्या सूचनेमधील विहित व्यवसायांवर विचार विनीमय करण्याकरिता मतदानाकरिता तसेच सभासदांचे रजिस्टर व शेअर ट्रान्सफर बुक्स कंपनीच्या ई-मतदान सुविधेच्या प्रदानित प्राधिकृत एजन्सीद्वारे नियुक्त केले आहे.
१. जर तुम्ही डिमॅट स्वरूपातील धारक असाल व तुम्ही अजून डिपॉझिटरी पार्टिसिपंटसह तुमचे ईमेल आयडी नोदणीकृत केले नसतील तर कृपया तुम्ही डिपॉझिटरी पार्टिसिपंट्ससह तुमचा ईमेल आयडी नोदणीकृत करावा.
२. जर तुम्ही पत्यक्ष स्वरूपातील शेअर्सधारक असाल तर तुम्ही तुमचे ईमेल आयडी नोदणीकृत करावे व ईमेल नोदणीकरण फॉर्म भरावा व स्कॅन प्रत स्वाक्षरी केलेले फॉर्म कंपनीची ईमेल akcslagm@akgroup.co.in वर पाठवावे. सदर ईमेल नोदणीकरण प्रपत्र आमची वेबसाइट <www.akgroup.co.in> वर उलपब्ध आहेत.

४. कंपनी त्यांच्या सर्व सभासदांना परोक्ष ई-मतदान सुविधा (परोक्ष ई-मतदान) प्रदान करत आहे व सर्व त्यांचे सभासद यांनी सर्व ठरावांवर ३१ व्या एजीएमच्या सूचनेमध्ये पार पाडण्यात येईल. या व्यतिरिक्त, कंपनी एजीएमच्या (ई-मतदान) दरम्यान ई-मतदान पणाली मार्फत मतदानाची सुविधा प्रदान करेल. परोक्ष ई-मतदान व ई-मतदानाच्या मार्फत मतदान पार पाडण्याकरिता विस्तृत पक्रिया व माहिती एजीएमच्या दरम्यान सर्व सभासदांना (डिपॉझिटरी पार्टिसिपंट्स/ कंपनी/ आरटीए यांच्यासह नोदणीकृत नसलेल्यांना ईमेल आयडी वर प्रत्यक्ष पारूपातून शेअर्स धारक सभासद यांच्यासह) कंपनीच्या ३१ व्या एजीएमच्या सूचनेमध्ये अहवालीत आहे.

५. **स्विकृत लाभांशाकरिता नोदणीकरण करणे आवश्यक आहे :**
सभासदांनी कृपया त्यांचे संपूर्ण बँक तपशील नोदणीकरण/अद्ययावत करावे :
१. डिपॉझिटरी पार्टिसिपंट्स यांच्यासह त्यांचे डिमॅट खाते पाहावे व जर शेअर्स डिमटेरियलाईज्ड स्वरूपातील असल्यास डिपॉझिटरी पार्टिसिपंट्स द्वारे दस्तावेज सादर करणे आवश्यक आहे.
२. लिक इनटाईम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड समवेत कंपनीच्या आरटीए सह संबंधित दस्तावेज आवश्यक यांच्यासह दाखल व फॉर्म आयएसआर-१ यांच्यास सादर करणे आवश्यक आहे जर शेअर्स प्रत्यक्ष स्वरूपातील धारक असतील तर.

ए. के. कॅपिटल सर्व्हिसेस लिमिटेडकरिता
सही/-
ए. के. मित्तल
व्यवस्थापकीय संचालक
(डीआयएन : ००६९८३७७)

ठिकाण : मुंबई
दिनांक : २६ ऑगस्ट, २०२४

वाचकांची पत्रे

महाराज, आम्हांला क्षमा करा

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील मालवणमधील राजकोट किल्ल्यावर उभारण्यात आलेला छत्रपती शिवाजी महाराजांचा पूर्णाकृती पुतळा कोसळल्यामुळे मनाला अतीव वेदना झाल्या. महाराज, तुम्ही अवघ्या महाराष्ट्राचे आराध्य दैवत! तुम्ही गेल्यानंतर ३४४ वर्षांचा प्रदीर्घ काळ लोटला आहे. त्याचबरोबर सध्या तुमच्या नंतरची महाराष्ट्रातील १३ वी पिढी तुमच्या प्रेरणेने आणि आशीर्वादाने जीवनाची कालक्रमणा करत आहे. महाराज, सुमारे साडेतीनशे वर्षांनंतरही तुमचे स्मरण केल्याशिवाय आमचा एकही दिवस जात नाही. आपल्या महाराष्ट्राचा राज्यशकटही तुमच्या प्रेरणेने हाकला जात आहे. तुम्ही आपल्या मराठी अस्मितेचे शक्तिशाली प्रतीक आहात. तुमचे स्मरण आम्हांला सदैव व्हावे, तुमची मूर्ती सतत आमच्या डोळ्यासमोर राहावी म्हणून अनेक ठिकाणी आम्ही तुमचे प्रेरणादायी पुतळे उभारले आहेत. महाराज, स्वराज्य रक्षणासाठी तुम्ही अनेक किल्ले बांधले. तुफानी वादळवाऱ्यांना तोंड देत साडेतीनशे वर्षांनंतरही ते किल्ले कोसळले नाहीत. आजही ते मजबूत आणि शाबूत आहेत. पण महाराज, आम्ही बांधलेला एक पुतळा वादळवाऱ्याला तोंड देऊ शकला नाही आणि अवघ्या आठ महिन्यात मालवणचा तो पुतळा काल कोसळून खाली पडला. खरे तर या अक्षम्य चुकीसाठी, आम्ही क्षमा करायच्या योग्यतेचेही नाहीत. पण तरी ही आमची चूक मोठ्या मनाने पोटात घ्या आणि महाराज, आम्हांला क्षमा करा.

- प्रदीप शंकर मोरे, अंधेरी

जगभरातील रेडिओ ऐकणाऱ्यांचे प्रमाण वाढले

जगभरातील तब्बल २६ देशामध्ये एक रेडिओ संबधी पाहणी करण्यात आली होती. त्यामध्ये अगदी १६ वर्षांपासून ते ६४ वर्षापर्यंत च्या लोकांचा समावेश केला होता. या मध्ये केवळ वयाने मोठे असलेले लोकच रेडिओ ऐकतात असे नसून १६ ते २४ या वयोगटातील ५९ टक्के तरुण रेडिओ ऐकतात. जगभरातील या साठी ४३ हजार लोकांशी बोलून हा अभ्यास केलेला आहे. ही बातमी नुकतीच वाचली. आजकाल रेडिओ ऐकणारांची संख्या वाढली आहे सुमारे चार पाच दशकांपूर्वी. एक जमाना असा होता कित्या वेळेस रेडिओ शिवाय काही बातम्या ऐकावयास मिळत नसत. प्रत्येक गावातील ग्रामपंचायत ऑफिस मध्ये सरकारी रेडिओ असे. त्यावर बातम्या व शेतीविषयक कार्यक्रम संध्याकाळी प्रसारित केले जात. १९६२ च्या चीन युद्धाच्या वेळी अशा रेडिओ भोवती शेकडो लोक गोळा होऊन बातम्या ऐकत असत. सरकारी बातम्या असल्यामुळे त्यावर विश्वास होता. आज दिवसभर अनेक टी व्ही वाहिन्या बातम्या प्रसारित करत असतात. त्या ऐकून अनेक जण कंटाळतात.त्या पेक्षा पूर्वीचे रेडिओ बरे असे अनेकांना वाटते. आजही अनेक घरात रेडिओ लावलेले दिसून येतात. जगभरात सुद्धा हीच परिस्थिती असावी असे वाटते रेडिओ गाणी ऐकणाराचे प्रमाण सुद्धा मोठे आहे. रेडिओ बघणारे ६३ टक्के लोक गाणी ऐकतात असे सर्वेक्षण सांगते एकूणच रेडिओ हे एक आजकाल प्रत्येक घरात महत्वाचे साधन बनले आहे.

- शांताराम वाघ, पुणे

भग्न पुतळ्याची छायाचित्रे प्रसारित होणे चुकीचे

मालवणमधील राजकोट येथील छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा कोसळल्याची घटना जितकी दुर्दैवी आहे तितकीच ती वेदनादायक आहे. या घटनेवरुन जे राजकारण सुरु झाले आहे तेही चीड आणणारे आहे.